I J R S S I S,Spl Issue (IV), March-2022 :182-184
A Double-Blind Peer Reviewed Journal

OPEN ACCES

e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article

INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES

© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# २१व्या शतकातील स्त्री पुढील आव्हाने

प्रा. डॉ. वनिता य. वंजारी
गृहशास्त्र विभाग प्रमुख
श्री शिवाजी कला, वानिज्य व विज्ञान महाविद्यालय, राजुरा
Corresponding Author:-vrbarai11@gmail.com

Communicated :20.02.2022 | Revision : 15.03.2022 Accepted :25.03.2022 | Published: 30.03.2022

**सारांश :**

आजच्या स्त्रीपुढे जुन्या काळातील स्त्रियांपेक्षा फार मोठा संघर्ष उभा ठाकलेला आहे. काळानुरूप प्रश्नाचे स्वरूप बदलेले आहे. हे आव्हान ती कसे स्विकारते हे तिने प्राप्त केलेले शिक्षण, संस्कार, व्यवसाय, वैचारिक, भावनिक व आर्थिक स्वावलंबन यावर अवलंबून असते. महिलांच्या सक्षमीकरणासाठी शासण स्तरावर कुठले प्रयत्न केले जातात आणि त्या प्रयत्नांच्या मदतीने स्वत:ची आव्हाने कसे सोडवील आणि जीवनात यश मिळवू शकतील हे महत्वाचे आहे.

**महत्वाचे शब्द :–**स्त्री, संघर्ष, जीवन, शिक्षण, दुर्गा, सरकार.

**प्रस्तावना** :–

नारी विश्वासमोर प्राचीन काळापासून प्रत्येक युगात नवनवीन आव्हाने उभी राहीलेली आहेत. परंतु स्त्रीने सहनशीलता, चिकाटी, कष्टाळूपण व आपल्या बुध्दीचातुर्याने सामाजीक, आर्थीक, कौटुंबिक अशा सर्वच आव्हानांना समोर जाऊन त्यावर मात केली आहे. आज स्त्रीने केवळ पुरूषांची बरोबरीच केली नाही तर अनेक क्षेत्रात ती पुरूषांपेक्षा वरचढ झालेली आहे. आज २१व्या शतकात सुध्दा तिच्या समोर बरीच आव्हाने उभी आहेत. या पैकी आर्थीक आव्हानांनी रौद्र रूप धारण केलेले आहे. या आव्हानासमोर ती दुर्गा बनून उभी राहीलेली आहे.

**स्त्री जीवन व शैक्षणीक पैलू:–**

२१व्या शतकात ज्ञानाचा स्फोट झालेला आहे. स्त्रीच्या शैक्षणीक जीवनात सुध्दा आमुलाग्र बदल झालेला आहे. शहरी भागाबरोबरच ग्रामीन भागातही स्त्रयांच्या जीवनात चांगलेच परिवर्तन घडून आलेले आहे. शिक्षणा शिवाय तरणोपाय नाही हा मंत्र रोमारोमात भिणला आहे. शिक्षणाच्या सोयी सवलती सरकारणे उपलब्ध करून दिल्या आहे. त्याचा फायदा स्त्रीया आपआपल्या क्षमतेप्रमाणे घेत आहे. त्यामुळे सुशिक्षीत स्त्रियांची संख्या वाढत आहे. त्यांना असे वाटणे स्वाभावीकच आहे की आपण आपल्या पायावर उभे राहावे, आर्थिकदृष्टया सक्षम व्हावे. या इच्छेला पूरक कारण म्हणजे दिवसेंदिवस महागाईचा आलेख चढतच आहे. अमर्याद गरजांना आता वेसण घालणे गरजेचे आहे. पण त्यालाही एक सीमा आहे. जीवनावश्यक गरजा भागवणे क्रमप्राप्तच आहे. त्यामुळे घेतलेल्या शिक्षणाचा उपयोग करून आपले उत्पन्न वाढवावे व गरजांशी मेळ घालून आर्थिक प्रश्न सोडविण्याचा विचार स्त्रीयांच्या मनात रूजलेला आहे. अशा आर्थिक आव्हानांना तोंड देण्यासाठी एखादा व्यवसाय किंवा आपल्या क्षमतेप्रमाणे एखादी नोकरी मिळविण्याचा प्रयत्न स्त्रिया करित असल्साचे दिसत आहे.

**महिला आणि स्पर्धा युक्त परिस्थिती:—**

पूर्वी प्रमाणे आता स्त्रीने नोकरी करावी यात कुणालाच वावगे वाटत नाही. पण या महत्वाकांक्षी सुशिक्षीत महिला समोर तीव्र स्पर्धेचे आव्हान उभे आहे. या आव्हानावर मात करणे कठीण जरी असले तरी अशक्य नाही. सर्वप्रथम स्पर्धेत टिकण्यासाठी स्वत:चा व्यक्तीमत्व विकास घडवून आणावा लागेल. ' वाचाल तर वाचाल' हा मंत्र उपयोगात आणावा लागेल. इंटरनेटच्या माध्यामातून आवश्यक ज्ञान संपादन करावे लागेल. शुध्द भाषा, शुध्द उच्चारण, आकर्षक संवाद शैली आत्मसात करणे गरजेचे आहे. स्पर्धा परिक्षेची तयारी करणे गरजेचे आहे. वरील गोष्टी आत्मसात केल्यावरच छान नोकरीची आशा ठेवणे वास्तविकच आहे, तसेच नोकरी मिळविण्याच्या दृष्टीने बरीचशी अनुकूलता प्राप्त होईल.

**स्त्री आणि अध्यापण क्षेत्रातील आव्हान:—**

स्त्रियांच्या दृष्टीने अध्यापन हे अधिक सुविधापूर्ण व सुसंगत आहे. पण या क्षेत्रात नोकरीच्या बाबतीत अत्यंत निराश्या जनक चित्र दिसून येत आहे. प्राथमिक शाळेच्या शिक्षकापासून तर महाविद्यालयीन प्राध्यापकाच्या पदासाठी लाखो रूपयाचे डोनेशन मागण्यात येत आहे. अशी ओरड सर्वत्र सुरू आहे.'डोनेशन' हा शब्द किती गोंडस आहे . डोनेशन देणा—या दानवीरांना काय म्हणावे? पालक केवळ मुलांसाठी छातीवर दगड ठेवून विचार करू शकतो परंतु मुलींसाठी? अपवादात्मक कुणी मुलगा, मुलगी समानतेचा पुजारी सापडेल. अविवाहीत युवतीसाठी तर हे फार मोठे आव्हान आहे. शिक्षण शेत्रातील दारे नोकरीची दारे त्यांच्या साठी खजिन्याच्या दारापेक्षाही अधिक भक्कम झाली आहेत. पण या डोनेशन रूपी राक्षसास कोण घालेल पायबंद?

सरकारी क्षेत्रात हा प्रकार नसल्यासारखाच आहे. म्हणून युवतींचे लक्ष या क्षेत्रातील नोकरीकडे वेधल्या जात आहे. एखादी युवती उच्च विद्या विभुषीत असली व तिला नोकरी मिळाली तर काही आव्हानांना तिला सामोरे जावे लागते. भ्ष्टाचाराचे भूत थैमान घालीत आहे.'मी खाती, तुम्ही खा, आपण सर्व खाऊया' या भ्ष्टाचार मंत्राचा जाप करायचा, की या प्रवाहा विरूध्द जायचे? हा प्रश्न येतोच, जाप करणा—यांची संख्या जास्त आहे. तेव्हा आदर्शवाद्याच्या पदरी निराशाच येण्याची दाट शक्यता आहे.

**सातवा वेतन आयोग व असंघटीत स्त्री श्रमिक:—**

सातव्या वेतन आयोगाने वाढत्या महागाईला पायबंद घालण्यासाठी सरकारी व निमसरकारी कर्मचारी, शिक्षक, प्राध्यापक इ. वर्गासाठी त्यांच्या वेतनात योग्य ती वाढ केली आहे त्यामुळे हा वर्ग वाढत्या महागाईशी व्यवस्थित समायोजन करीत आहे. परंतु खाजगी क्षेत्रात, कृषी क्षेत्रात मोलमजुरी करणा—या असंघटीत स्त्री—पुरूषांचे वेतन मात्र जवळ—जवळ तेवढेच आहे. त्यामुळे अशा कुटुंबातील स्त्रियांना घर चालविणे हे फार मोठे आव्हान आहे. अर्थव्यवस्थेतील ही फार मोठी विसंगती आहे. या संबंधी केवळ कायदे करून चालणार नाही याची काटेकोरपणे अंमलबजावणी होणे अत्यंत आवश्यक आहे. तसे न झाल्यास संघटीत होऊन अहिंसक मार्गाने आंदोलने करून हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न होणे आवश्यक आहे.

**स्त्रियांसाठी विविध आवश्यक योजना:—**

स्त्री हा अर्थव्यवस्थेतील महत्वाचा घटक आहे. एकूण श्रमपुरवठयातील ४८टक्के श्रमपुरवठा ज्या घटकापासून प्राप्त होतो ती म्हणजे स्त्री घटक होय. म्हणूनच स्त्रियांसाठी राज्याने विविध योजना आखल्या आहेत.

१. सुवर्ण जयंती ग्राम स्वयंमरोजगार योजना.

२. महिला व बालविकासासाठी स्वयंसेवी संस्थांना अर्थसहाय्य.

३. संशोधन विषयक अर्थसहाय्याची योजना.

४. महिलांच्या शिक्षणासाठी योजना.

५. महिलासाठी विज्ञान व तंत्रज्ञान विषयक योजना.

६. बायोगॅस प्लॅन्टसाठी योजना.

७. कृषीविषयक साधण सामग्री विकास योजना.

८. लघुउद्योग क्षेत्रासाठी विपणन योजना.

९. शेडयुल्ड व्यापारी बॅंका मार्फत मार्जीन मनी योजना.

१०. संजय गांधी निराधार योजना.

११. व्यावसायीक प्रशिक्षणची योजना.

१२. राष्ट्रीय पाळणाघर निधी योजना.

अशा कितीतरी योजना उपलब्ध आहेत.अनेक स्त्रियांनी यातून स्वयंरोजगार देणारे उद्योग सुरू केले आहे.

**निष्कर्ष:**

वरील योजना भ्रष्टाचार न होता कार्यान्वित झाल्यातर २१व्या शतकातील स्त्रिया आर्थिक आव्हानावर आपल्या कर्तृत्वाने सहज मात करतील व आपण ख—या अर्थाने म्हणू शकू 'मेरा देश महान' तसेच 'यत्र नार्यस्तु पुज्यन्ते, रमन्ते तत्रदेवता' हे सुभाषित देखील प्रत्यक्ष साकारेल. या ठिकाणी एक छोटासा इशारा द्यावासा वाटतो की वर्तमान समाजाची भ्रष्टाचारी प्रवृत्ती एखाद्या हिंसक क्रांतीच्या बीजांना खत पानी म्हणून तर सिध्द होणार नाही ना? हे सत्य नाकारता येणेही कठीण आहे. तेव्हा वेळीच सावध होऊन 'एकमेका साहय करू अवघे धरू सुपंथ' या कल्याणकारी विचाराची कास धरणे सर्वाच्याच हिताचे ठरेल.

**संदर्भ:—**

नागरिकासाठी केंद्र व शासनाच्या विकास योजना : चौधरी लॉ पब्लिशर्स

संवाद पत्रिका : यशवंतराव चौव्हान मुक्तविद्यापीठ, ज्ञान गंगोत्री नाशिक

यशस्वी उद्योजकाची गुरूकिल्ली स्त्री :जोशी सरोज

स्त्री आणि मानवी हक्क, शोध निबंध :प्रा. डॉ.सौ. मेघा देशपांडे २००८

लोकराज्य महाराष्ट्र शासन २००९